# गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली

महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशी–४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापीत व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम कमांक ६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ)

## (कुलसचिव कार्यालय)

एम.आय.डी.सी. रोड, कॉम्प्लेक्स, गडचिरोली — ४४२६०५

फोन/फॅक्स नंबर ०७१३२–२२३१०४ E-Mail : gug.registrar@gmail.com

जा.क्र./गोंवीग/कुसका/ २१८ /२०२१ दिनांक ०५/०१/२०२१ ०६

सुधारीत

## अधिसूचना

संदर्भ :– गोंडवाना विद्यापीठाची अधिसुचना कमांक कुसका/१३०२३/२०२०
दिनांक २८/१२/२०२०

उपरोक्त संदर्भीय अधिसुचनेच्या अनुषंगाने गोंडवाना विद्यापीठाच्या सर्व प्राधिकरणांचे सन्माननिय अध्यक्ष/सदस्य तसेच संलग्नित सर्व महाविद्यालयाचे प्राचार्य व विभाग प्रमुख पदव्युत्तर शैक्षणिक विभाग तथा संबंधित विद्यार्थ्यांना कळविण्यात येते की, गोंडवाना विद्यापीठाच्या शैक्षणिक सत्र २०१९–२० च्या विविध पदवी, पदव्युत्तर व पदवीका अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना सुवर्ण पदके तसेच पदवी बहाल करण्याच्या अनुषंगाने विद्यापीठाचा **''आठवा दीक्षांत समारंभ'' दिनांक २८/०१/२०२१** रोजी **सकाळी ११.०० वाजता चंद्रपूर वन प्रशासन, विकास व व्यवस्थापन प्रबोधिनी, मुल रोड, चंद्रपूर** च्या सभागृहात आयोजीत करण्यात आलेला आहे.

सदर दीक्षांत समारंभाचे अध्यक्ष म्हणून विद्यापीठाचे कुलपती **मा. श्री. भगतसिंहजी कोश्यारी** महामहिम राज्यपाल, महाराष्ट्र राज्य, प्रमुख अतिथी म्हणून **मा. डॉ. एस. सी. शर्मा,** संचालक, नॅक, बंगलोर तसेच गोंडवाना विद्यापीठाचे कुलगुरू **मा. प्रा. श्रीनिवास वरखेडी** व प्र–कुलगुरू **मा. डॉ. श्रीराम कावळे** यांच्या विशेष उपस्थितीत संपन्न होणार आहे.

कृपया याची नोंद घ्यावी.

मा. कुलगुरू महोदयांच्या आदेशान्वये

6.1.2021

**(डॉ. अनिल चिताडे)**
कुलसचिव (प्र.)
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली